# प्रेस नोट

दिनांक ३१/१२/२०१९

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | १) श्री. प्रितम चंद्रकांत कासारे, मंडळ अधिकारी, आंजर्ले ता. दापोली जि. रत्नागिरी<br>२) श्री. प्रभाकर भिमराव सोनवणे, वय-४२ वर्षे, तलाठी सजा केळशी, रा. काळकाई कोंड, श्री. सतिश शंकर शिर्के यांचेकडे भाडयाने ता. दापोली, जि. रत्नागिरी मुळगांव वडगांव स्टेशन, ता. सोलपे जि. परभणी |
| घटनेचे ठिकाण | तहसिलदार कार्यालय, दापोली ता. दापोली जि. रत्नागिरी चे समोरील हॉटेल गुरुप्रसाद येथे |
| मागितलेली लाच रक्कम | आरोपी लोकसेवक नं. ०१ व आरोपी लोकसेवक नं. ०२ यांनी १५,०००/-रुपये. |
| तडजोडीअंती मागितलेली रक्कम | आरोपी लोकसेवक नं. ०१ व आरोपी लोकसेवक नं. ०२ यांनी १०,०००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | आरोपी लोकसेवक क्रमांक ०२ यांनी १०,०००/-रुपये. |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांनी केळशी ता. दापोली येथील जमिन गट नं. ८६/१३/१ व ८६/१२ क्षेत्र ४.८० गुंठे हि जमिन घरासह दिनांक १२/०६/२०१८ रोजी खरेदी खताने खरेदी केली आहे. खरेदी खताचे पेपरप्रमाणे त्या जमिनीची नोंद सातबारा उताऱ्यावर होवून त्यांचे नाव लागणेसाठी जमिनीचे खरेदीखताचे पेपर आरोपी लोकसेवक क्र. २ यांचेकडे दिले होते. सदर कामाचा पाठपुरावा करणेसाठी तक्रारदार यांनी तहसिलदार कार्यालय, दापोली येथे जावून आरोपी लोकसेवक १ व २ यांची भेट घेतली असता दोन्ही लोकसेवकानी १५,०००/- रूपये लाच रक्कमेची मागणी करून, ती रक्कम दिल्याशिवाय तक्रारदार यांचे काम करणार नसल्याचे आरोपी लोकसेवक १ व २ यांनी तक्रारदार यानां सांगितले. म्हणुन तक्रारदार यांनी वरील लोकसेवकांविरुध्द दिनांक २६/१२/२०१९ रोजी लाचेची मागणी केल्याची लेखी तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांचेकडे दिली होती.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २६/१२/२०१९ रोजी करण्यात पडताळणी कारवाई मध्ये आरोपी लोकसेवक १ व २ यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी खरेदी केलेल्या जमिनीची ७/१२ उताऱ्यावर नोंद करून, ७/१२ उतारा देण्यासाठी त्यांचेकडे १५,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती १०,०००/- रूपये स्विकारण्याचे मान्य केले.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार आज दिनांक ३१/१२/२०१९ रोजी सापळा आयोजित करण्यात आला असता, आरोपी लोकसेवक नं. २ यांनी तक्रारदार यांचेकडे लाच रक्कमेची मागणी करुन, लाच रक्कम १०,०००/-रुपये स्वत:साठी व आरोपी लोकसेवक नं. १ यांचेसाठी तहसिलदार कार्यालय दापोली समोरील हॉटेल गुरुप्रसाद येथे स्विकारल्यानंतर आरोपी लोकसेवक नं. २ यांना तहसिलदार कार्यालय, दापोलीचे आवारातील तलाठी संगणक भवनामध्ये १२.५१ वाजता पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.**

**Toll Free No :- 1064**
**Telephone No :- 02352/222893**
**Office email :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in**
**Website :- www.acbmaharastra.gov.in**
**Mobile App :- www.acbmaharastra.net**
**Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB**

31/12/19

Dy. Supdt. of Anti Corruption Bureau, सत्यमेव जयते, RATNAGIRI

**(प्रविण कदम)**
**पोलीस निरीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी**